आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१ सप्टेंबर २०२४ -रविवार

**ठळक बातम्या**

- सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन ध्वज आणि बोधचिन्हाचं राष्ट्रपतींच्या हस्ते अनावरण
- ऑगस्ट महिन्यात भारतीय भांडवली बाजारात २५ हजार कोटी रुपयांहून अधिक परदेशी गुंतवणूक
- मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीचं मुंबईत आंदोलन/ मविआच्या निषेधार्थ भाजपाचंही आंदोलन

**आणि**

- पश्चिम आशियात संघर्षग्रस्त गाझा पट्टीत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध यंत्रणांमार्फत ६ लाख ४० हजार बालकांना पोलिओ लस देण्याची मोहीम आजपासून सुरु

**<><><><><>**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयानं स्थापनेपासून गेल्या ७५ वर्षांमध्ये जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीच्या न्यायव्यवस्थेचा पहारेकरी म्हणून अमूल्य योगदान दिलं आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोपसत्रात त्या बोलत होत्या. सर्वोच्च न्यायालयाचं नवं बोधचिन्ह आणि ध्वजाचं अनावरण करून आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यतो धर्मस्ततो जयः या बोधवाक्याप्रमाणे, न्याय आणि अन्यायाचा निर्णय देणारी सगळी न्यायालयं धर्मक्षेत्रं आहेत, न्यायाप्रति आस्था आणि श्रद्धा आपल्या

परंपरेचा एक भाग आहे, असं त्या म्हणाल्या. सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड यांनीही या सत्राला संबोधित केलं. जिल्हास्तरीय न्यायपालिका परिषदेमुळं न्यायपालिकेच्या आत्तापर्यंतच्या प्रवासाकडे तटस्थपणे बघण्याची आणि भविष्यात कोणत्या दिशेने आपल्याला जायचं आहे, हे ठरवण्याची प्रामाणिक संधी आपल्याला मिळाली, असं प्रतिपादन त्यांनी केलं. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करून स्थानिक भेदभाव, राज्यकेंद्रित निवड यांच्या मर्यादा पार करून पुढे जाण्याची, जिल्हास्तरीय न्यायपालिका अधिक व्यापक, सर्वसमावेशक करण्याची हीच वेळ असल्याचं मतही त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

लष्करी शाळांमध्ये मुलींना प्रवेश देण्याचा निर्णय हा गेम चेंजर अर्थात मोठं परिवर्तन करणारा आहे, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या निर्णयाचं वर्णन करताना म्हटलं आहे. लैंगिक समानता आणि लैंगिक न्यायातली महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवणारं हे पाऊल असल्याचं त्यांनी सांगितलं. भविष्यातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि जागतिक कल्याणासाठी योगदान द्यायला छात्रसैनिक तयार आहेत, असं आज उत्तराखंडमधल्या  डेहराडून इथं RIMC अर्थात राष्ट्रीय भारतीय लष्करी महाविद्यालयातल्या छात्रसैनिकांना संबोधित करताना, ते म्हणाले.

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूकदारांनी सलग तिसऱ्या महिन्यात आपल्या गुंतवणुकीचा ओघ कायम ठेवला असून ऑगस्ट महिन्यात भारतीय भांडवली बाजारात २५ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. परकीय चलनसाठाविषयक आकडेवारीनुसार ऑगस्ट महिन्यात परदेशी गुंतवणूकदारांनी समभाग बाजारपेठेत ७ हजार ३२० कोटी रुपये तर ऋण बाजारपेठेत १७ हजार ९६० कोटी रुपयांची

गुंतवणूक केली आहे. परदेशी गुंतवणूकदारांनी यावर्षात आतापर्यंत भारतीय भांडवली बाजारपेठेत एकूण दीड लाख कोटी रुपये गुंतवले आहेत.

**<><><><><>**

वित्तीय समावेशनाचं उद्दिष्ट गाठण्यात बँकांनी आपल्या सुलभ आणि किफायतशीर सेवांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असं केंद्रीय दूरसंवादमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी म्हटलं आहे. भारतीय पोस्ट पेमेंट बँकेच्या सातव्या स्थापना दिनानिमित्त त्यांनी समाजमाध्यमावरच्या एका पोस्टमध्ये या बँकेच्या कामगिरीचा उल्लेख केला आहे.  या बँकेत आतापर्यंत ९ कोटी ८८ लाख भारतीयांनी खाती उघडली आहेत. याशिवाय वेगवेगळ्या योजनांच्या लाभार्थ्यांना ४५ हजार कोटी रुपयांचे लाभ या खात्यांमधून दिले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

हंगामी आणि प्लॅटफॉर्म कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत आणण्यासाठी सरकार विविध मार्गांचा शोध घेत असल्याचं केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ मनसुख मांडविय यांनी सांगितलं. नवी दिल्लीत आढावा बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. या कामगारांची नोंदणी ही ई-श्रम पोर्टलद्वारे केली जाणार आहे. हंगामी आणि प्लॅटफाॅर्म कामगारांना नियुक्त करणाऱ्यांना कंपन्यांनी त्यांच्या कामगारांची नोंदणी करावी असं सांगितलं जाईल यावर मांडविय यांनी भर दिला.

**<><><><><>**

एअर मार्शल तेजिंदर सिंग यांनी आज नवी दिल्ली इथं भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. एअर मार्शल तेजिंदर सिंग १३ जून १९८७

पासून भारतीय हवाईदलाच्या सेवेत असून त्यांचं शिक्षण राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, संरक्षण सेवा महाविद्यालय आणि राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयात झालं आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये एअर ऑफिसर कमांडिंग म्हणूनही ते कार्यरत होते. २००७ मध्ये वायुसेना पदक आणि २०२२ मध्ये अतिविशिष्ट सेवापदक या पदकांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय पोषण सप्ताह आजपासून देशभरात सुरू झाला. महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या अन्न आणि पोषण मंडळातर्फे सन १९८२पासून दरवर्षी १ ते ७ सप्टेंबरदरम्यान हा सप्ताह आयोजित केला जातो. पोषण आणि आरोग्याबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणं हा या सप्ताहाचा उद्देश आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीनं आज मुंबईत आंदोलन केलं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार अरविंद सावंत, खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, अनिल देशमुख, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, पृथ्विराज चव्हाण, आमदार भाई जगताप, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेते आणि कार्यकर्त्यांनी हुतात्मा चौकात जमून सरकारचा निषेध केला. नांदेडमध्ये विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं.

<><><><><>

विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून त्यांना पराभव दिसत आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे परिस्थिती बदलली असल्याचा दावा त्यांनी केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीचं आंदोलन पूर्णपणे राजकीय असल्याची टीका छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना केली.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून भाजपानंही आज राज्यात ठिकठिकाणी आंदोलन केलं.

**<><><><><>**

विधी आणि न्याय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं ही सकारात्मक बाब असून, भारतीय न्यायव्यवस्था अधिक सृदृढ आणि बळकट असल्याचं ते द्योतक आहे, असं महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या मुलींच्या वसतीगृहाचं उद्घाटन आज फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. न्यायदानाची प्रक्रिया ही अधिकाधिक तंत्रस्नेही आणि लोकाभिमुख करण्यात आपण योग्यदिशेनं पावले टाकत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज देशातल्या ५० युवा नादस्वरम कलाकारांना शिष्यवृत्तीचे धनादेश प्रदान करण्यात आले. मुंबईत झालेल्या 'नादस्वर उत्सव' या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते युवा आणि होतकरू नादस्वरम वादकांना प्रत्येकी १ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रसिद्ध नादस्वर वादक शेषमपट्टी शिवलिंगम यांना

**श्रीषण्मुखानंद नादस्वरमचक्रवर्ती संगीतकलाविभूषण जीवनगौरव पुरस्कार** प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या अस्मिता खेलो इंडिया उपक्रमामुळे मुली आणि महिलांचा क्रीडा स्पर्धांमधला सहभाग लक्षणीयरीत्या वाढत आहे, असं केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सांगितलं. भारतीय खेल प्राधिकरण, खेलो इंडिया तसंच ज्युदो असोसिएशनच्या वतीनं ‘अस्मिता खेलो इंडिया’ या उपक्रमाअंतर्गत पश्चिम विभागाच्या वुमन्स लीग ज्युदो स्पर्धेला आज नाशिक इथं खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. अशा स्पर्धांमुळे युवतींना प्रोत्साहन मिळून त्यांचं सबलीकरण होत असल्याचं त्या म्हणाल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रासह राजस्थान, छत्तीसगड, गुजरात , गोवा, मध्य प्रदेश आणि दीव - दमण अशा सात राज्यांच्या ८९४ खेळाडूंनी भाग घेतला आहे.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत आज बॅडमिंटनमध्ये महिलांच्या एसयू - पाच प्रकारात भारताच्या मनीषा रामदास हीनं उपान्त्य फेरीत धडक मारली आहे. उपान्त्य फेरीत तिचा सामना भारताच्याच टी मुरुगेशन सोबत होणार आहे. त्यामुळे या स्पर्धेतलं भारताचं एक पदक निश्चित झालं आहे. पुरुष एकेरीतही एस एल पाच - प्रकारात उपान्त्य फेरीचा सामना भारताच्या सुकांत कदम आणि सुहास यतिराज यांच्यात होणार आहे. या स्पर्धेत भारत एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह २२व्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

पॅरालिम्पिक स्पर्धेत पदकविजेत्या मोना अगरवाल, प्रीती पाल, मनिष नरवाल, रुबिना फ्रान्सिस यांच्याशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दूरध्वनीवरुन संवाद साधला. प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं असून पदकविजेत्या खेळाडूंच्या कामगिरीचा देशाला कौतुक असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियात संघर्ष ग्रस्त गाझा पट्टीत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध यंत्रणांमार्फत ६ लाख ४० हजार बालकांना पोलिओ लस देण्याची मोहीम आजपासून सुरु झाली. गेल्या महिन्यात या परिसरातल्या बालकाला टाईप २ च्या पोलिओची लागण झाल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं जाहीर केलं. त्यानंतर ही मोहीम सुरु करण्यात आली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या अनेक भागात जेरदार पाऊस होत असून संततधार पावसानं नदी-नाल्यांना पूर आला आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याची तीव्रता वाढली असल्याने राज्यात येत्या तीन दिवसांत बहुतांश भागात जोरदार पाऊस होईल असा वेधशाळेचा अंदाज आहे.

**सोलापूर ,यवतमाळ, नांदेड, वाशिम, आणि हिंगोली** जिल्ह्यात पावसानं जोरदार हजेरी लावली. त्यामुळं  जनजीवन विस्कळीत झालं आहे. येत्या दोन दिवसात राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पऊस पडेल असा अंदाज आहे.

**<><><><><>**